# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## स्पर्धा परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत सद्यस्थिती

## घोषणा

आयोगामार्फत कॅलेंडर वर्षात होणा-या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जाते. तथापि, काही कारणामुळे (उदा. शासनाकडून विहित वेळेत किंवा अपूर्ण मागणीपत्र येणे, मागणीपत्र न येणे, न्यायालयीन स्थगिती इत्यादी) घोषित अंदाजित वेळापत्रकानुसार जाहिरात प्रसिध्द करणे, पूर्व परीक्षा किंवा मुख्य परीक्षा घेणे काही वेळा शक्य होत नाही. जाहिरात प्रसिध्द करण्यास अथवा परीक्षा घेण्यास आयोगाच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे काही वेळा विलंब होतो. परीक्षेच्या दिनांकाबाबत अद्ययावत माहिती उमेदवारांना नसल्याने आयोगाकडे विचारणेकरीता अर्ज, दूरध्वनी येतात, वर्तमानपत्रातून बातम्याही प्रसिध्द होतात व मुख्य म्हणजे उमेदवारांच्या परीक्षेच्या पूर्व तयारीच्या नियोजनात अनिश्चितता येवू शकते. विलंबाचे कारण आयोगाच्या नियंत्रणाबाहेरचे असले तरीही आयोगाबद्दल गैरसमज निर्माण होतात. यास्तव स्पर्धा परीक्षांच्या अंदाजित वेळापत्रकामध्ये एखादया/काही परीक्षांच्या आयोजनात बराच विलंब होणार असल्यास त्याबाबतची सद्यस्थिती आयोगामार्फत यापुढे प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारांनी सदर सद्यस्थितीची वेळोवेळी माहिती करुन घ्यावी.

सुचिता ज. परब
उप सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुंबई
दिनांक :- १ सप्टेंबर, २०१५